JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# “महाराष्ट्रातील हरितक्रांतीच्या काळातील उपाययोजनामुळे आज झालेला बदल”

**मार्गर्शक**
**डॉ. सुभाष के. पवार**
**एम.ए., नेट. पीएच.डी. समाजशास्त्र**
**(समाजशास्त्र विभाग प्रमुख)**
**पीएच.डी. संशोधन केंद्र**
**स्व. डी.पी. आर्ट कॉलेज नांदगांव पेठ,**
**अमरावती.**

**संशोधक विदयार्थी**
**कु. जयश्री सिताराम पवार**
**एम.ए. (समाजशास्त्र, मराठी)**
**पीएच.डी. संशोधक विदयार्थी समाजशास्त्र विभाग**
**संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती**
**भ्रमणध्वनी क्रमांक – 8380967775**
**Emil ID : omvedsunil@gmail.com**

**संशोधनाचा विषय –**

“महाराष्ट्रातील हरितक्रांतीच्या काळातील उपाययोजनामुळे आज झालेला बदल”

**संशोधनाचे क्षेत्र –**

हरितक्रातीमुळे महाराष्ट्रातील परिस्थितीचे सविस्तर वर्णन आणि झालेला बदल हेच मर्यादित क्षेत्र राहणार आहे.

**सारांश –**

एखादया राष्ट्राच्या सुबत्तेचा निकष त्या राष्ट्रातील नागरिकांच्या सुबत्तेवर अवलंबून असतो. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात दिर्घकाळ मुख्यमंत्री राहून वसंतराव नाईकांनी तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करुन समाजहितासाठी हरितक्रांतीची मुर्हूतमेठ रोवून सामान्य जनतेला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवले.

1963 ते 1975 या प्रदिर्घ कालावधीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर असतांना शेतीविषयक व अनेक योजना, जास्त उत्पादन देणारी पिकांच्या जातीची बियाने, खते, फळबागांची निर्मिती, पिक संरक्षण व जलसिंचनाचा वापर तसेच शेतीला जोड व्यवसाय निर्मीती तसेच पिकांवर संशोधनसाठी कृषीविदयापीठ निर्मीती आणि या सर्व उपाययोजनांचा आजच्या परिस्थितीत झालेला बदल तपासणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उदिदष्टये –**

1) तत्कालीन परिस्थितीचे अध्ययन करणे.
2) वसंतराव नाईकांनी शेतीविषयक राबविलेल्या योजनांचा आभ्यास करुन झालेल्या बदलाचे अध्ययन करणे.
3) समाजातील परिस्थितीत झालेला बदलाचे अध्ययन करणे.

**गृहितकृत्ये –**

1) आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतकऱ्यांच्या अन्नधान्यात (पिकाच्या) उत्पादनात वाढ झाली.
2) तत्कालीन परिस्थितीत वसंतरावांनी आखलेल्या योजना व कार्यक्रामंची यशस्वी फलश्रृती झाली.
3) शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी अनेक दिशा मिळाल्या.
4) तत्कालीन परिस्थितीत महाराष्ट्र राज्य हे देशपातळीवर एक प्रगतीशील राज्य म्हणून नावारुपास आले.

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत विषयावर संशोधन करतांना ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषनात्मक संशोधन पध्दतीचा वापर तसेच विविध स्त्रोतांच्या माध्यमातून संदर्भाचे संकलन करणे.

**प्रस्ताविक –**

आज आपण आपला महाराष्ट्र हा विकसित महाराष्ट्र, प्रगतशिल महाराष्ट्र, अन्नधान्याने भरभरुन वाहणारा एकंदरीत समृध्दतेने नटलेला महाराष्ट्र पाहत आहोत.

या सर्व संपन्नतेमागे महाराष्ट्रातील हरितक्रांती घडविणारे वसंतराव नाईक यांची दुरदृष्टी प्रतिबिंबीत होते.

**1960 चा महाराष्ट्र –**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात अनेक राज्यांची निर्मीती झाली. नव्याने सर्व राज्याचे कारभार सुरु झाले. राज्यातील नागरिकांची प्रती करुन राज्य समृध्दीकडे वाटचाल सुरु झाल्या. तत्कालीन परिस्थिती ही अनेक समस्यांशी सामना करत होती. नागरिकांचे अज्ञान, अंधश्रध्दा, गरिबी, दुर्बलता अनेक समस्यांने समाज पिंजला होता. ना रस्ते होते, ना गाडया होत्या. धान्याची कमतरता होती. रेशनदुकानावर धान्य शासन पुरवायचे तर मैल न मैल रांगा लागायच्या कित्येकदा तर नंबर येईपर्यंत धान्य संपून जायच.

अपुरी साधने, आधुनिक यंत्रसामुग्रीचा अभाव, पाण्याचे नियोजन नाही, परंपरागत शेती, शेती विषयक अज्ञान अशा अनेक समस्यांनी महाराष्ट्र पिंजला होता.

1963 हे वर्ष अन्नधान्याच्या बाबतीत अत्यंत कठीण होते. राज्यात ज्वारीला भाव पूर्णपणे कोसळलला होता. पिंकांचे उत्पादन लोकसंख्ये च्या मानाने कमी होते.

1950 ते 51 हया वर्षापासून लोकसंख्या 6.4 टक्के पण धान्यउत्पादन मात्र 2.5 टक्यांनी वाढते म्हणजे लोकसंख्या वाढीचे प्रमाण धान्यउत्पादनवाढीच्या तिप्पट होते आणि याचे कारण होते. मागासली शेती. शेतकऱ्यांना दारिद्रयामुळे, खते, सुधारलेली बी-बीयाने, यांत्रिक अवजारे वगेरेचा वापर करता येत नाही. अपुरे पाऊसपाणी व पाणीपुरवठा या योजनांचा आभाव यामुळे हजारो वर्ष सतत वापरात असलेलया निष्कृष्ट जमिनीतून पुरेसे पीक निघत नाही.

शेतकऱ्यांचे अज्ञान, कर्ज बाजारीपणा जाचक भूधारणापध्दती यांचा धान्यात्पादनावर वाईट परिणाम झाला होता. त्या दुष्काळी काळाने तर अजुनच भर घातली गेली. रोजगार नव्हेते. परिणामी रोजगारी नाही.

अल्पभूधारकांचा प्रश्न बेरोजगारांच्या प्रश्न, चाऱ्याचे प्रश्न अशा अनेक समस्यांनी महाराष्ट्र त्रस्त होता. भारतीय भरकटलेली, गोंधलेली दिशाहीन व धोरणाशुन्य शेतीला योग्य वळणावर आणणे गरजेचे होते.

**वर्ष 1960 ते 1975 –**

महाराष्ट्र राज्याची निर्मीती 1 मे 1960 रोजी झाली. अवघ्या दोन वर्षात मुंबईला सचिवालयाची अर्धीसत्ता महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापर्यंत पोहचविण्याचे फार मोठे यश त्यावेळचे मुख्यमत्री यशवंतराव चव्हाण यांनी मिळवले.

यशवंतराव चव्हाण संकल्पनेतून पंचायत राज अस्तीत्वात आली पण त्याची प्रगतीशिल पाऊले वसंतराव नाईक यांनी टाकली व त्यामुळेच विकासकामांची अमलबजावणी करणे सोपे झाले. एक एक विषय हातात घेवून त्यांनी या महाराष्ट्राच्या बांधनीचा पूर्ण ध्यास घेतला. किती विषय किती संकल्पना 15 वर्षात जे उभे राहीले ती त्यांची निर्माणकार्य दुरदृष्टी होती.

पुण्याच्या पानशेतच्या भीषण प्रलयानंतरचे पुर्नवर्सन, जिल्हापरिषद निर्मीती, साहित्य संस्कृती मंडळ निर्मिती, ज्वारीखरेदी धोरण उत्पादन वाढीकरिता केलेला आटापीटा, कोयनेच्या भीषण भुकंपानंतरचे पुर्नवर्सन, कोराडी, पारस, उजनी, जायकवाडी, अप्परवर्धा, अरुणावती, पेंच गावातील जुन्या चाळीची दुरुस्ती आणि पुर्ननिर्माण त्या करिता विशेष कायद, चार कृषी विदयापीठे रोजगार हमी, कापूस एकाधिकार अशा अनेक प्रकारची मोठी मोठी कामे जिददीने उभी राहीली, संकटावर मात करुन जसे भूकंप, दुष्काळ, परकीय आक्रमण की स्वकीय आतंकवाद असोत.

शेतीवर प्रेम करुन महाराष्ट्राच्या विकासाची बांधणी नाईकांच्या काळात झाली. शेती सपन्न झाली तर दश संपन्न होईल, लोकशाही संपन्न होईल. शेती मोडली तर देश मोडेल, देशाचे आणि शेतीचे, माणसाचे आणि मातीचे इतके अस्सल नाते सांगणारा नेता हा महाराष्ट्रात हरितक्रांतीचा व महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविणारा होता.

आज खुल्या बाजारातील धान्य महाग असले तरी धान्याची उपलब्धता आहे. खुल्या बाजारात धान्य शिगोशिग भरले आहे. पन्नास वर्षात या देशातील शेतकऱ्यांनी कष्ट करुन अन्न धान्याच्या बाबतीत देशाला स्वावलंबी बनवले आहे. त्यात महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचा वाटा मोठा आहे.

ज्वारी एकाधिकार योजना ही तत्कालीन केंद्रिय कृषीमंत्र्यानी नाकरली तरी पण तत्कालीन पंतप्रधानांना पटवून देऊन महाराष्ट्रात एकाधिकार ज्वारी खरेदी सुरु केली. शेतकऱ्यांना 65 रुपये क्विंटल भाव दिला आणि ही खरेदी केलेली ज्वारी स्वस्त धान्यदुकानांवर नुकसान सोसून वाटप करा अशी योजना आमलात आणली. 12 एप्रील 1964 महाराष्ट्र शासनाच्या ज्वारी खरेदी योजनेला विक्रमी प्रतिसाद मिळाला.

होत गेलेला बदल अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी यांत्रिक लागवडीच्या पध्दतीने अधिकाधिक पडीक जमीन लागवडीखाली आणून पीक उत्पादनाचे क्षेत्र वाढविण्यात आली. खार जमिनीची सुधारणा करण्यात आली विहित, ओढे, नाले, बंधारे यातील पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करुन ओलिताखालील क्षेत्रात वाढ करण्याकरिता शेतकऱ्यांना सवलती देण्यात आल्या होत्या. संकरित बी बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके व रोगनाशके यांचा त्यांना वेळच्या वेळी व मोठया प्रमाणात पुरवठा करण्यात आला. याचे कारण असे झाले की, शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळत गेले शेतकऱ्यांना कर्ज व इतर आर्थिक मदतही तत्परतेने करण्यात आली.

हंगाम सुरु होण्यापूर्वी अन्नधान्याचे भाव बांधून देण्यात आले. दुबार पिके घेता यावी म्हणून ग्रामीण भागात बियाणे पुरवठा करण्यात आला. डिसेंबर 1966 अखेर सहा हजाराहून अधिक गावांना वीजपुरवठा करण्यात आला व शेतीच्या पाणीपुरवठासाठी 60 हजाराहून

अधिक विजपंप बसविण्यात आले. उत्पादन वाढीसाठी 1966 साली खुदद मुख्यमंत्र्यानी पुणे, सातारा, कोल्हापूर, उस्मानाबाद अशा जिल्हयांचा दौरा करुन शेतकऱ्यांमध्ये उत्पादन वाढीसाठी एक चैतन्य निर्माण केले होते.

शेतकरी हा एकच विषय शेतकऱ्यांसमोर ठेवला होता हा दौरा करण्यामागचा हेतू हा शेतकऱ्यामध्ये धान्योत्पादनवाढीसाठी योग्य वातावरण निर्मिती करणे व शासनयंत्रणेच्या काहि अडीअडचणी असतील सोडवणे हा होता. कोयना ग्रस्तांना वनिकरणातील काही मुदतीत जमीन लागवडीसाठी दिल्या लिफट इरिगेशन योजनेत दोन वर्षाचे पाणी परवाने दिले. सकंरित पिकांचा कार्यक्रम हातात घेवून शेलू व गहुली या दोन्ही ठीकाणी संकरित ज्वारीच्या बियाण्याचा उत्पादनाची मुहूर्त मेठ रोवली. प्रत्यक्ष पाहणी शेतात जावून आणि मजुरांच्या अडी अडचणी विचारुन घेत. प्रत्यक्ष पिकांची पाहणी व शेतकरी व अधिकारी, तज्ञ यांच्यातील संवाद हे आधुनिक तंत्रज्ञान म्हणजे एक्स्टेंशन मेथडच होती. एच 4 या संकरित कापसाचे पिक घेण्याचा कार्यक्रम खरोखरीच एक शेती उदयोगाच्या क्षेत्रात महत्वाचे स्थान निर्माण केले. नेसिसिटी इज दि मदर ऑफ इन्वेन्शन गरज ही शोधांची जननी आहे. या धर्तीवर शेती ही अनेक उदयोगांची जननी आहे.

चांगल्या बियांची निवड करणे त्यांचे मोजमाप करुन ठराविक प्रमाणात पिशव्यात भरणे, पिशव्यांची शिलाई करणे ही रोजगाराची कामे तसेच जंगलविकास कुक्कुटपालन, पशुपालन, मधुमक्षिकापालन अशा व्यवसायाची सांगड शेती व्यवसायाशी घातल्या गेल्याने परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाली.

गिरण्या, भाजीपाला, फळावरील पक्रिया, तेल घाणा, कापसाचे जिनिंग व प्रेसिंग, दुधाचे पदार्थ, पशुखादय, यासारख्या उदयोगांची जननी ही शेती असल्यामुळे हया उदयोगांची सुरुवात झाली. जमिनविषयक कादयामुळे आज आपल्या शेतकऱ्यांची मानताठ आहे.

गुणवत्ताप्राप्त बियाणांची निर्मीती, संशोधन, त्यासाठी आधुनिक प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी महाबीज ने पुढाकार घेतला. 28 एप्रील 1976 ला या बियाणेमहामंडळाची स्थापना झाली. 1972 पासूनच नाईकांनी बियाणे महामंडळाची स्थापनेची सुरुवात केली होती. त्याकरिता 10 कोटी रुपयाचे भाग भांडवल आणि 100 रुपयांचा एक शेअर या दृष्टीने त्यांनी आर्थिक व्यवस्था केली होती. त्याच बरोबर राज्य सरकारचा समभाग शेअर 49 टक्के राष्ट्रीय बियाणे महामंडळाचा समभाग 35.44 टक्के शेतकऱ्यांचा समभाग 12.70 टक्के आणि महाराष्ट्र राज्य कृषी विदयापीठाचा, समभाग 02.86 टक्के अशी भागभांडवलाची टक्केवारी मुख्यमंत्रीनी केली होती.

बुलढाणा, लातूर, परभणी या ठीकाणी शाख काढण्यात आल्या. शेतीच्या उत्पादनवाढीचा असा शास्त्रशुध्द पाया नाईकसाहेबांच्या संकल्पनेतुन साकार झाला. दुष्काळावर मात करण्यासाठी दुष्काळ पिडीत शेतकऱ्यांना व भूमिहिन मजुरांना उत्पादक रोजगार पुरवायच्या योजना आमलात आणून नागरिकांचे मनोबल वाढवले. फलोत्पादन, सामाजिक वनीकरण पशुपालन व दुग्ध व्यवसाय, कृषीसाधन, भाजीपाला उत्पादन या बाबत कार्यक्रम राबवले. अनियमित व अपुऱ्या पावसामुळे हया क्षेत्रातील धान्याचे उत्पादन शाश्वत होण्यासाठी पाणलोट विकास क्षेत्र, नविन तलावाची निर्मिती, लघुसिंचन, शेततळे तयार केले गेले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक समस्या शासनासमोर होत्या. राज्यांची निर्मीती झाल्यानंतर स्वतंत्र कारभारातून नियोजन करुन सामान्य नागरिकापर्यंत पोहचून राज्याला व परिणामी देशाला समृध्द बनवण हा मोठा टास्क राज्यशासनाकडे होता. नुसते ध्येय धोरण ठरवून व त्याच्या सिध्दीसाठी यंत्रणा उभी करुन भागत नाही त्यासाठी प्रत्यक्ष जनतेला प्रत्यक्षात काय लाभ झाला ही पण बाजू तेवढीच महत्वाची आहे.

30 वर्षापूर्वी आपण कोठे होतो व आज कोठे आहोत याचा निर्लेप मनाने विचार केला तर उदयोगधंदे, विजनिर्मीती, रस्ते बांधणी, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, वाहतूक अशा कित्येक क्षेत्रात झालेली प्रगती आपल्या यशाचे खरे मोजमाप होय. अन्नधान्याच्या बाबतीत आपण गेल्या 29 वर्षात शेतीच्या उदयोगाचा कायापालट घडवून मिळवलेले यश हे नजरेत भरण्याजोगे आहे. जमीनविषयक केलेल्या सुधारणे संबंधी कायदयामुळे आपल्या शेतकऱ्यांची मान ताठ आहे.

भारत अन्नधान्यात स्वावलंबी होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे अधिक उत्पादन देणाऱ्या धान्य पिकांच्या जातींची लागवड होय. भात, गहू, ज्वारी, बाजरी व मका हया पिकांच्या स्थानिक जातीपेक्षा दुप्पट किंवा तिप्पट उत्पादन देणाऱ्या जाती शास्त्रज्ञांनी शोधून काढल्या आज त्या जातींनी मोठे क्षेत्र आपले आहे 1971-72 यावर्षी त्या जातीखाली 15.4 दशलक्ष हेक्टर क्षेत्र होते ते 1995 हया वर्षी 75 दशलक्ष हेक्टर झाले. म्हणजे लागवडीचे क्षेत्र पाचपटीनपे वाढले.

ज्वारी पिकाचे 2020-21 मधील महाराष्ट्रातील लागवडीचे क्षेत्र 1859.1 हेक्टर असून ज्वारीचे उत्पादन 190.6 टन एवढे आहे तर प्रती हेक्टरी उत्पादकता 1025.6 किलो ग्रॅम हेक्टर अशी आहे. महाराष्ट्र राज्याने फालोदयान क्षेत्रात मोठीच प्रगती केली आहे. आज महाराष्ट्र आंबे, द्राक्ष, डाळींब, बोरे, केळी, पपई व चिकू हया फळांच्या उत्पादनामध्ये देशात अग्रेसर आहे.

एकंदरित शेतकऱ्यांचे कैवारी वसंतराव नाईक यांनी शाश्वत शेती, उन्नत शेतीचा संदेश देत भारतीय शेतीला नवे आयाम देण्याचे कार्य केले.

**हरित क्रांतीमुळे झालेला बदल –**

**1) भरपूर उत्पादन देणाऱ्या सुधारित बियाणांचा वापर –**

यात ज्वारी, तांदुळ, मका, गहु, कापूस, कडधान्य यांचा समोवश होतो.

**2) रासायनिक खतांचा वार –**

पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी त्यांना जमिनीकडून पुरेशाप्रमाणात पोषक तत्वांची आवश्यकता असते या बियाण्यांना आवश्यक पोषकतत्वे जमिनीकडून मिळत नाही तेव्हा नायट्रोजन, फॉस्फरस व पोटॅशियमयुक्त अशा रासायनिक खतांचा वापर केला जावू लागला व भरपूर उत्पादन घेवू लागले.

**3) सिंचन –**

नैसर्गिक तसेच कृत्रित मार्गांनी पाणी देण्याकरिता सिंचनाचे सर्व मार्ग शोधण्यात येवून सिंचनाचा वापर करुन पाणी पुरवण्याची सोय करण्यात आली.

**4) रासायनिक किटकनाशके आणि जंतू नाशके यांचा वापर –**

पिकांचे सरंक्षण करण्याकरिता रासायनिक किटकनाशक तसेच तननाशकांचा वापर केला जाऊ लागला.

**5) साठवणूक विपणन व वितरण –**

हरितक्रांतीमुळे नविन पिकांचे संपूर्ण देशामध्ये वितरण आवश्यक होते. याकरिता विपनणाची योग्य साखळी वितरण व्यवस्था आणि वाहतुकची सोय याची आवश्यकता होती. यामध्ये सार्वजनीक वितरण व्यवस्था अन्न महामंडळ यांच्या माध्यमातून उत्पादन झालेल्या अन्नधान्याचे विपणन वितरण करणे सोपे झाले.

**6) किंमत धोरण –**

शेतकऱ्यांना शासनाने खरेदीची हमी देवून उत्पादन वाढवण्यास प्रोत्साहन दिले.

**7) कृषी यांत्रिकीकरण –**

पारंपारिक शेतीच्या औजारांची जागा ट्रॅक्टर, थ्रेशर, हार्वेस्टर यासारखी औजारे कृषीक्रांतीमुळेच पहायला मिळातात.

**8) कमाल जमिण धारणा –**

या कायदयाने प्रत्येकाकडे विशिष्ट मर्यादेपर्यंतच जमीन बाळगण्याचा अधिकार प्राप्त झाला व सर्व सामान्यांना जमिन कसण्यासाठी मिळू लागली.

**9) खेडयातील विदयुतीकरण –**

खेडयातील विदयुतीकरणामुळे अनेक लहान मोठया उदयोग व्यवसायांना वाव मिळाला.

**10) रस्ते व बाजार सुविधा –**

कुठल्याही भागाचा विकास करायचा असेल तर सर्व प्रथम तो मुख्य भागाशी जोडला जाणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून खेडयांना परिणामी शेतीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रस्ते विकास व बाजार सुविधांचा विस्तार यावर हरितक्रांती मध्ये विशेष लक्ष दिले गेले.

**11) विविध पिके घेण्याच्या विविध पध्दती –**

पारंपारीक पिकं सोडून त्या ऐवजी विविध व्यावसायीक, नगदी पिके, फुल, फळझाडे घेण्यात येवू लागली व परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती व राहणीमान उंचावले शेतीपिकांबरोबरच जोडव्यवसायांची पण निर्मीती झाली आणि परिणामी शेतकऱ्यांचे राहणीमानही उंचावले.

**12) कृषी कर्ज –**

हरितक्रांतीचा हा सर्वात मोठा फायदा आहे. पुर्वी शेतीकडे शेती हा उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहिल्या जात होते. कारण हातात रोख पैसा राहत नव्हता. आधुनिक शेतीसाठी आर्थिक सक्षमता आवश्यक होती.

तसेच तरुणांना शेतीकडे आकर्षित करण्यासाठी भांडवल म्हणून बी बियाणे, खते, किटकनाशके, आंतर मशागतीसाठी लागणारा खर्च हा कृषी कर्ज म्हणून हंगाम सुरु होण्यापूर्वी देण्याची संकल्पना पुढे आली.

**13) माती व पाणी परिक्षण –**

पिकांचे उत्पादन वाढण्यासाठी पिकांवरील रोगांची माहिती हाणे व त्यासाठी जमिनीचा पोत व पाण्यातील घटक हे कितपत पिकांसाठी योग्य आहेत हे परिक्षणासाठी प्रयोगशाळा तयार करण्यात आल्या.

**14) कृषी विदयापीठे, विविध संशोधन व विज्ञान केंद्रे –**

पिकनिहाय संशोधन करुन तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यापर्यंत पोहचवणे अत्यंत महत्वाचे होते व त्यासाठी सुसज्ज यंत्रणा व साधनसामग्रीची आवश्यकता असल्याने कृषी विदयापीठांची निर्मीती झाली.

**निष्कर्ष –**

हरितक्रांतीमुळे शेतीचे पुर्नजीवन झाले. सामान्य नागरिक हा शेतीत पिकांचे उत्पादन वाढवू लागला आहे व देश हा अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे.

शेतीला जोडव्यवसायाची साथ मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व राहणीमान व समाजातील स्थान उंचावले आहे. शेतीत निरनिराळे पिकांचे प्रयोग करण्यात येत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादन क्षमता वाढत आहे. भावी पिठीसाठी सरकारी नोकरीपेक्षा शेती ही उत्पादन देणारी संस्था आहे हे दिसत आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची –**


1) कळसे, डॉ. अनंत, चतुरस्त्र वसंतराव नाईक हरित क्रांतीचे प्रणेते. प्रकाशक, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, 1 जुलै 2013

2) रुद्रवार, डॉ. उत्तम, महाराष्ट्राचे वसंत वैभव प्रकाशक – आणि प्रा. धुमाळे 18 ऑगस्ट, 1992.

3) कर्णीक, मधु मंगेश, दुत पर्जन्याचा मुख्यमंत्री – वसंतराव नाईक यांचे चरित्र प्रकाशक- नरेंद्र तिडके. लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई.

4) नाईक, वसंतराव, समृध्दीच्या वाटा प्रकाशक- महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई. 9 जानेवारी, 1975.

5) 'ऋतुगंध' – वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान, पुसद

6) भावे मधुकर, महानायक, निर्मीती वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठान, पुसद

7) डा. पाटील जयंतराव, वेध कृषी विकासाचा, प्रकाशक – वसंराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठान